नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | अंक - ३५ | वार शनिवार दि. २१ जून २०२५ | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | पाने - ४ | किंमत - ४.०० रुपये | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026
Year - 3rd | Issue - 35 | Blow- Saturday Date 21 June 2025 | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | Pages - 4 | Amout - 4 /- Rs | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## अक्कलकोट पाणी पुरवठ्यातील उप अभियंता राठोड स्वतःला राजा सत्य हरिश्चंद्र समजतो



### काम न करता बोगस बिले लिहून टक्केवारी जमा करतो

### ‘जल जीवन मिशन’मध्ये झालेल्या सर्व कामांची चौकशी करून उप अभियंता राठोड यांना जिल्हा बाहेर बदली करा : शाम बाबर

भाग - ४

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट /विशेष प्रतिनिधी

अक्कलकोट तालुक्यातील जल जीवन मिशन कामात मोठ्या प्रमाणात घोटाळा झाले असून कामाची गुणवत्ता न तपासता उप अभियंता विद्याधर राठोड हे अर्धवट कामाचे पूर्ण बील लिहून शासनाचे दिशाभूल करत आहे जल जीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजना तालुक्यातील अनेक गावात चालू असून शासनाने एक चांगले उपक्रम राबवित असून टक्केवारी खाणाऱ्या अधिकाऱ्यांमुळे सदर योजनेची बट्याबोळ होत आहे अनेक गावात काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याचे लेखी तक्रार येऊन देखील त्यावर टक्केवारी बहादुर अधिकारी केराची टोपली करत आहे, वरून मात्र स्वतःला राजा सत्य हरीचंद्र असल्याचे दिखावा मात्र नेटाने करताना दिसून येतो.

गोगांव, वागदरी, किरणळी, भुरीकवठे, सापळा, शिरशी, शिरवळ, ब्यागेहळी या गावातील कामाची गुणवत्ता निकृष्ट दर्जाची असून अंदाजपत्रक प्रमाणे काम न करता उप अभियंता अंदाजपत्रका प्रमाणे एम बी मात्र लिहिण्यात तरबेज आहे, अर्धवट काम असताना जास्त टक्केवारी घेऊन बील तयार करून देत आहे.

ब्यागेहळी येथे पाईप लाईन बेकायदेशीर घालण्यात आले आहे त्या ठिकाणी उप अभियंता राठोड यांचे डोळे मिटून ठेकेदाराची गळा भेट घेत बील तयार करण्यास व्यस्त असल्याचे दिसून येत आहे ज्या गावात पाईप लाईन झाले आहेत त्या गावामध्ये नियमाप्रमाणे लांबी, रुंदी, उची नसल्याचे दिसून येत आहे अनेक गावात राठोड आणि ठेकेदार यांनी संगनमत करून लो कॉलिटी पाईप आणण्यास सांगून त्यावर बोगस शिक्के मारल्याचे सुत्रानी माहिती सांगितले आहे वागदरी भागातील जे ई काटकर यांना कुठलेच काम येत नसून माप घेता येत नाही, एम बी व्यवस्थित लिहिता येत दुसऱ्याकडून माहिती घेण्यामध्ये एक महिना घालत असतात येणाऱ्या सरपंच, ठेकेदार यांना विनाकारण पळवा पळवी करत असतात एका दिवस होणारे काम महिना दोन दोन महिने घालतात, अशा बिन कामाच्या जे ई यांना वागदरी भागातून काढून त्या ठिकाणी नवीन अनुभवी जे ई देण्याची मागणी या भागातील लोकप्रतिनिधी करीत आहेत

**जल जीवन मिशन अंतर्गत झालेल्या सर्व कामाचे चौकशी समिती द्वारे अंदाजपत्रक प्रमाणे त्याठिकाणी काम झालंय का व झालेल्या कामा प्रमाणे एम बी तयार करण्यात आले का, वागदरी भागात जे ई काटकर आल्यापासून किती काम झाले आहेत त्या सर्व कामाचे चौकशी करून ज्या ज्या कामा विरोध लेखी तक्रार आले असताना त्याची चौकशी न करता एम बी तयार दिले असेल व अंदाजपत्रक प्रमाणे काम झाले नसेल आणि टक्केवारी घेऊन बील दिलं असेल तर चौकशी करून निलंबनाची कार्यवाही करण्याची मागणी शाम बाबर यांनी केले आहे.**

## एअर इंडियाच्या विमानात टेकऑफआधी बिघाड; पायलटनं रनवेवरच प्लेन थांबवलं, मोठा अनर्थ टळला




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हैदराबाद: एअर इंडियाच्या विमानाचा मोठा अपघात टळला आहे. एअर इंडियाचं विमान हैदराबादहून मुंबईला जाण्यासाठी निघालं होतं. तितक्यात विमानात तांत्रिक बिघाड झाला. त्यामुळे वैमानिकानं विमान धावपट्टीवरच रोखलं. त्यानं विमानाचं उड्डाण रद्द केलं. त्यामुळे मोठा अनर्थ टळला.

विमानानं उड्डाण करण्यापूर्वीच विमान थांबवण्यात आलं. वैमानिकानं अखेरच्या काही मिनिटांमध्ये विमानं रोखलं. विमानात तांत्रिक बिघाड असल्यानं त्यानं टेकऑफ रद्द केलं. त्यामुळे संभाव्य धोका टळला. विमानातील सगळे प्रवासी सुरक्षित आहेत. एअर इंडियाच्या कर्मचाऱ्यांनी तत्परता दाखवत प्रवाशांसाठी दुसऱ्या विमानाची व्यवस्था केली. त्या विमानातून प्रवाशांना मुंबईला पाठवण्यात आलं.

१२ जून २०२५ रोजी, म्हणजेच गेल्याच आठवड्यात अहमदाबादहून लंडनला जाणाऱ्या एअर इंडियाच्या एआय-१७१ विमानाला भीषण अपघात झाला. प्राथमिक अहवालानुसार, विमानाची दोन्ही इंजिन्स फेल झाली. त्यामुळे विमान उड्डाणानंतर अवघ्या मिनिटभरात बीजे मेडिकल कॉलेजच्या एका इमारतीवर कोसळलं. या विमानात एकूण २४२ जण होते. यातील २४१ जणांचा मृत्यू झाला. एअर इंडियाचं विमान बीजे मेडिकल कॉलेजवर कोसळलं. तिथल्या २२ जणांचा अपघातात मृत्यू झाला. एअर इंडियाच्या ताफ्यातील बोईंग ड्रीमलायनर ७८७ विमान १२ जूनच्या दुपारी लंडनला जाण्यास निघालं. अहमदाबादच्या सरदार वल्लभभाई पटेल विमानतळावरुन विमानानं उड्डाण केलं. लंडनच्या गॅटविक विमानावर हे विमान उतरणार होतं. पण टेकऑफनंतर एका मिनिटाच्या आत विमानाला अपघात झाला. विमानाला सात हजार किलोमीटर अंतर कापायचं असल्यानं त्यात लाखभर लीटर इंधन होतं. विमान कोसळताच मोठा स्फोट झाला. इंधनानं पेट घेतला. आगीची तीव्रता जास्त असल्यानं प्रवाशांना वाचवण्याची संधीच मिळाली नाही.

## देशात अनेक वर्षांपासून औद्योगिक क्षेत्राचे नेतृत्व महाराष्ट्राकडे : गृहमंत्री अमित शहा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : खरी शिवसेना कोणाची यावरुन उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यात आरोप प्रत्यारोप सुरु असतात. अशातच आता यामध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी उडी घेतली आहे. खरी शिवसेना कोणची याचा परिचय एकनाथ शिंदे यांनीच करुन दिल्याचे मत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी करुन दिला आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले तेव्हादेखील डबल इंजिन सरकार होते. त्यानंतर देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाले, परत डबल इंजिन सरकार आल्याचे अमित शाह म्हणाले.

महाराष्ट्रातील देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या डबल इंजिन सरकारने मोदीजींच्या नेतृत्वात ७ लाख कोटीहून अधिक गुंतवणूक करुन मुंबईला वाचवण्याचे काम केल्याचे अमित शाह म्हणाले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चरच्या नवनिर्मित मुख्यालयाच्या इमारतीचे आणि मुंबईत राज्यस्तरीय सहकारी औद्योगिक परिषदेचे उद्घाटन अमित शाह यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. अनेक वर्षापासून महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्राचं नेतृत्व करत असल्याचे अमित शाह म्हणाले. त्यामुळंच मुंबईनगरीला देशाची आर्थिक राजधानी म्हणले जाते. देशातील सगळ्यात मोठी अर्थव्यवस्था महाराष्ट्राची आहे. एफडीआयमध्ये सगळ्यात जास्त हिस्सा महाराष्ट्रात आहे. सगळ्यात जास्त विदेशी पर्यटक महाराष्ट्रात, सगळ्यात जास्त स्टार्टअप महाराष्ट्रात जास्त असल्याचे अमित शाह म्हणाले. भारताचे सगळ्यात मोठे बंदर वाडवनमध्ये तयार होत आहे. येणाऱ्या काळात मुंबईचे काय होणार याची मला चिंता होती. कारण वाढत लोकसंख्या असेल, वाढती झोपडपट्टी, ट्रॅफिकची समस्या होती. पण मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करेल असे अमित शाह म्हणाले. त्यांनी पहिल्या सरकारच्या कार्यकाळात मुंबईच्या विकासासाठी सात लाख कोटी रुपयांची गुंतवणूक केल्याचे अमित शाह म्हणाले. यावेळी बोलताना अमित शाह यांनी काँग्रेसवर देखील टीका केली. किती वर्ष झालं तुमच्याकडे महाराष्ट्र होता. तुम्ही काय केले? मुंबईसाठी तुम्ही काय केले? असा सवाल अमित शाह यांनी केला. देशात विमानतळांची संख्या वाढली आहे. रेल्वे वाढल्या आहेत. मेट्रो झाली आहे असे अमित शाह म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या काळात मोठं काम झाल्याचे अमित शाह म्हणाले. औद्योगिक विकासासाठी निधी दिला, त्याचबरोबर जलसिंचनासाठी अनेदान दिल्याचे अमित शाह म्हणाले.

**कोणताही प्रकल्प रखडणार नाही याची सर्व संबंधितानी दक्षता घ्यावी**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचना**

## राज्यातील प्रकल्पांचे भूसंपादन ठरलेल्या वेळापत्रकानुसार पूर्ण करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील महत्त्वाच्या सर्व प्रकल्पांचे भूसंपादन ठरलेल्या वेळापत्रकानुसार पूर्ण करून प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावावेत. तसेच भूसंपादनाअभावी एकही प्रकल्प रखडणार नाही याची संबंधित सर्व यंत्रणांनी दक्षता घ्यावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

राज्यातील महत्त्वाच्या प्रकल्पांच्या भूसंपादनाचा आढावा मुख्यमंत्री फडणवीस यांनी वर्षा निवासस्थानी घेतला. त्यावेळी त्यांनी या सूचना दिल्या. यावेळी नागपूर - गोवा शक्तिपीठ महामार्ग, विरार - अलिबाग कॉरिडोर, जालना - नांदेड द्रुतगती महामार्ग, पुणे रिंग रोड पूर्व, पश्चिम व विस्तारीकरण, भंडारा - गडचिरोली द्रुतगती महामार्ग, नागपूर - चंद्रपूर द्रुतगती महामार्ग, नागपूर - गोंदिया द्रुतगती महामार्ग, नवेगाव (मोर) - सुरजागड मिनरल कॅरिडोर, वाढवण - इगतपुरी द्रुतगती महामार्ग या राज्यातील रस्ते प्रकल्पांच्या भूसंपादनाचा तसेच वर्धा - नांदेड, वडसा - गडचिरोली रेल्वे प्रकल्प आणि कोल्हापूर, कराड, अकोला, गडचिरोली आणि छत्रपती संभाजीनगर येथील विमानतळाच्या भूसंपादनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.



प्रकल्प रखडल्यामुळे त्याच्या किंमतीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होते असे सांगून मुख्यमंत्री म्हणाले की, भूसंपादनाच्या प्रक्रियेसाठी सर्व यंत्रणांना टाईमलाईन दिलेली आहे. त्याचे तंतोतंत पालन करण्यात यावे. सर्व यंत्रणा आणि संबंधित अधिकारी यांनी मिशन मोडवर काम करावे. भूसंपादनाची कामे गांभीर्याने घेऊन तातडीने मार्गी लावावीत. याबाबत सर्वांनी गुणात्मक आणि रचनात्मक काम करावे अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

मुख्यमंत्री म्हणाले की, शक्तिपीठ महामार्ग आराखडा गतीशक्तीवर रन करून त्याचा आराखडा तयार करून घ्यावा. जेणेकरून कमीत कमी वन जमीन बाधित होईल. या रस्त्याच्या भूसंपादनासाठी लागणाऱ्या १२ हजार कोटींच्या निधीची वित्त विभागाने तरतूद करावी. विरार - अलिबाग कॅरिडोरच्या मोरबे ते कारंजा टप्प्यामध्ये वन जमीन व कांदळवन असल्यामुळे त्यासाठी लागणाऱ्या परवानग्या घेण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करावी. तसेच या प्रकल्पाच्या परवानग्या घेत असतानाच प्रशासकीय प्रक्रिया समांतर सुरू ठेवावी. त्यामुळे कामास गती देता येईल. वाढवण - इगतपुरी द्रुतगती महामार्गाचा समावेश सागरमाला योजनेत करण्याविषयीचा प्रस्ताव सादर करावा. जालना - नांदेड द्रुतगती महामार्गाचे परभणी जिल्ह्यातील सेलू येथील भूसंपादनाची प्रक्रिया १५ दिवसात पूर्ण करावी. विदर्भातील भंडारा - गडचिरोली, नागपूर - चंद्रपूर, नागपूर - गोंदिया या सर्व द्रुतगती मार्गांचा आराखडा गतीशक्तीवर रन करून अंतिम करुन घ्यावा. वडसा - गडचिरोली व वर्धा - नांदेड रेल्वे मार्गाच्या भूसंपादनाची प्रक्रिया १५ दिवसात पूर्ण करून काम मार्गी लावण्यात यावे, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या. गडचिरोली विमानतळाचा ओएलएस करून घ्यावा आणि त्याचा प्रस्ताव गडचिरोली जिल्हाधिकारी यांनी पाठवावा. तर अकोला येथील विमानतळाच्या धावपट्टीची लांबी २४०० मीटर पर्यंत वाढवावी. अकोला येथे सुंदर आणि अत्याधुनिक तसेच मोठे विमानतळ उभारण्यात यावे, अशा सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील विमानतळ प्रकल्पांचा आढावा घेताना दिल्या. राज्यातील महत्त्वाकांक्षी ११ प्रकल्पांच्या भूसंपादनासाठी लागणाऱ्या ५३ हजार ३५४ कोटी रुपयांच्या निधीची तरतूदही करण्यात यावी, अशा सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

या बैठकीस महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, परिवहन व बंदरे विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम कुमार गुप्ता, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अनिल गायकवाड आदी उपस्थित होते.

## संपादकीय....

### राज्याची प्रगतीकडे वाटचाल

खरी शिवसेना कोणाची यावरुन उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यात आरोप प्रत्यारोप सुरु असतात. अशातच आता यामध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी उडी घेतली आहे. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले तेव्हादेखील डबल इंजिन सरकार होते. त्यानंतर देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री झाले, परत डबल इंजिन सरकार आल्याचे अमित शाह म्हणाले. महाराष्ट्रातील देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या डबल इंजिन सरकारने मोदीजींच्या नेतृत्वात ७ लाख कोटीहून अधिक गुंतवणूक करुन मुंबईला वाचवण्याचे काम केल्याचे अमित शाह म्हणाले. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चरच्या नवनिर्मित मुख्यालयाच्या इमारतीचे आणि मुंबईत राज्यस्तरीय सहकारी औद्योगिक परिषदेचे उद्घाटन अमित शाह यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. अनेक वर्षापासून महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्राचं नेतृत्व करत असल्याचे अमित शाह म्हणाले. त्यामुळंच मुंबईनगरीला देशाची आर्थिक राजधानी म्हणले जाते. देशातील सगळ्यात मोठी अर्थव्यवस्था महाराष्ट्राची आहे. एफडीआयमध्ये सगळ्यात जास्त हिस्सा महाराष्ट्रात आहे. सगळ्यात जास्त विदेशी पर्यटक महाराष्ट्रात, सगळ्यात जास्त स्टार्टअप महाराष्ट्रात जास्त असल्याचे अमित शाह म्हणाले. भारताचे सगळ्यात मोठे बंदर वाडवनमध्ये तयार होत आहे. येणाऱ्या काळात मुंबईचे काय होणार याची मला चिंता होती. कारण वाढत लोकसंख्या असेल, वाढती झोपडपट्टी, ट्रॅफिकची समस्या होती. पण मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन करेल.

# आंबेडकरवादी एस. के. गायकवाड

तुळजापूर तालुक्यातील आंबेडकर चळवळीतील सामाजिक कार्यकर्ते, बौद्धाचार्य व पत्रकार एस. के. गायकवाड (वागदरी)यांचा वाढदिवस. प्रत्येक सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमात ते आयोजक म्हणून सहभागी असतात. तुळजापूर तालुक्यातील प्रत्येक आंबेडकरी विचाराच्या कार्यक्रमात ते पुढे असतात. एस के नी अनेक सार्वजनिक कार्यक्रम आयोजित केले. आंबेडकरी विचाराचा आनंद व संपादन करत राहतात. महापुरुषांचे विचार माणसाला सशक्त करतात. ग्रंथातील ज्ञान आणि माणूस स्वतःचा मित्र बनतो. ग्रंथवाचन बाबासाहेब करत. ते ज्ञाने झाले. केवळ ग्रंथामुळे. ग्रामीण भागातील माणूस देखील बाबासाहेबांच्या मार्गावर जावा ही मनोमन इच्छा बाळगून असतात. तेव्हा बाबासाहेबांनी माणसांनी व्यासंग केला पाहिजे. व्यासंगामुळे विषयाची गोडी वाढते. भाषा प्रभुत्व व आत्मविश्वास निर्माण होतो. अहंकार व उद्धटपणा निघून जातो. साधेपणा निर्माण होतो. तेव्हा एस के वर आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव व परिणाम झालेला दिसून येतो. त्यांना नोकरी करता आली नाही. परंतु सामाजिक कार्याला एस के नी पूर्णपणे वाहून घेतले. हे सत्य आहे.

स्वभावाने 'एस के' गायकवाड हे अतिशय नम्र, साधे व सतत आंबेडकर चळवळीत व्यस्त असणारे सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार म्हणून तुळजापूर तालुका / उस्मानाबाद जिल्ह्यात प्रसिद्ध आहेत. त्यांच्या सामाजिक, धार्मिक आणि राजकीय क्षेत्रातील कामगिरी उल्लेखनीय कामगिरी बद्दल, गेल्या वर्षी आष्टाकासार येथील समीक्षा फाउंडेशनच्यावतीने त्यांना 'समीक्षा जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. ते पूर्ण वेळ बौद्धाचारी म्हणून देखील काम करत असतात तुळजापूर, उमरगा व लोहारा या तालुक्यातील बौद्ध विवाह संस्कारविधी करण्यासाठी त्यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. प्रत्येक मंगल परिणय प्रसंगी एस के गायकवाड. अगदी नाममात्र प्रवास खर्च घेऊन ते लग्न लावतात. त्यांना तसा कोणताही व्यवसाय नाही. परंतु निस्वार्थी पणाने धार्मिक क्षेत्रात, धम्म चळवळ गतिमान व्हावी याकरिता ते कार्यरत असतात. गावा गावातील धम्म चळवळ पिंजून काढून त्यांना धम्म शिकवणे बाबासाहेबांना अभिप्रेत असलेल्या धम्माची जाणीव निर्माण करून देणे व बाबासाहेबांच्या तत्त्वज्ञानाचा प्रचार प्रसार करणे ही कामे प्रामुख्याने आतापर्यंत करत आले आहेत. तसेच आपल्या परिसरातील मागासवर्गीय व वंचित समाजावरील झालेल्या अन्यायाला आपल्या लेखणीतून वाचा फोडण्याचं काम ते करत असतात

भगवान गौतम बुद्ध, शाहू, फुले आणि आंबेडकर आदर्श म्हणून ते नेहमी त्यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी ते उत्सुक असतात. समाजहित हाच त्यांच्या कार्याचा मध्यवर्ती केंद्रबिंदू आहे. एस के गायकवाड हे आतापर्यंत त्यांच्या जीवनात समाज, भाषा, संस्कृती, चालीरीती श्रद्धा, अंधश्रद्धा व जीवनपद्धती असे माणसाला अंतर्मुख करणारे अनेक विषय त्यांनी हाताळले आहेत. तरी त्यांच्याकडून यावर व्यापक स्वरूपात लेखन व्हावे. अशी अपेक्षा आहे. बाबासाहेब आंबेडकरांच्या लक्षणीय घोषणा म्हणजे शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा त्याचप्रमाणे शिक्षण प्रशिक्षण आणि प्रबोधन हे समाजाला आवश्यक आहे. हे प्रत्येक ग्रामीण भागातील घराघरातून व अनेक कार्यक्रमातून ते सतत प्रकट करत असतात. आपले अभिव्यक्ती स्वातंत्र्य एक ठराविक साच्यात बंद न करता त्यांनी प्रामाणिकपणे समाज हितासाठी व देश हितासाठी आपली लेखणी चालवावी व एक मुक्त चिंतन वैचारिक ग्रंथ त्यांच्याकडून यावा अशी अपेक्षा आहे.



त्यांच्या पत्रकारितेत माणूस हाच त्यांचा केंद्रबिंदू राहिला आहे माणूसच खऱ्या अर्थाने त्याच्या वास्तव जीवनाचा पुरस्कार आहे जगात शांतता नांदावी यासाठी प्रयत्नशील असणारी सम्यक दृष्टी सम्यक प्रज्ञा जगा आणि इतरांना जगू द्या या विचारांचा पुरस्कार ते नेहमी करत असतात सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी अन्यायाचा प्रतिकार करताना दिसून येतात.

सध्या पत्रकार साहित्यिक विचारवंत यांनी बुद्ध फुले आंबेडकर विचार वैश्विक आहेत हे पुन्हा पुन्हा सांगायला हवं. हे विचार सर्वसमावेशक आहेत व शिक आहेत हे साहित्यातून दाखवून द्यायला हवे. यासाठी लेखन करणे अतिशय महत्त्वाचे आहे.

यासाठी लिहीतं राहावं असं मला वाटतं. मानसिक बळ प्रोत्साहन आणि साहित्य हे अन्न वस्त्र निवारा इतकीच जगण्यासाठीची नैसर्गिक गरज आहे याची जाणीव ही आपल्या अनुभवातून लेखनातून व साहित्यातून देण्याची गरज आहे. प्रत्येक अडचणीवर दुःखावर अखेर लेखनच औषध म्हणून काम करत.... असे माझे मत आहे.

एस के गायकवाड यांना पुनश्च शुभेच्छा...!

**डॉ . दत्तात्रय गायकवाड;**
माजी ग्रंथालय व माहिती अधिकारी;
केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन केंद्र;
खडकवासला; पुणे-४११०२४
मो. ९८६०५९१३०५

### आरोपीकडून ३७ लाख रुपये किंमतीचे ६७ महागडे मोबाईल फोन हस्तगत

# क्रोमा शोरुम फोडून महागडे मोबाईल चोरणारा आंतरराज्यीय गुन्हेगार अटकेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : शहरातील, होटगी रोडवरील, टाटा कंपनीचे क्रोमा शोरुम फोडून, एका अज्ञात चोरट्याने शोरुम मधील विविध कंपन्यांचे ७८ महागडे मोबाईल फोन व एक क्रोमा शोरुमची काळया रंगाची सॅक (पिशवी) असा एकुण ४०,४१,२२०/- (चाळीस लाख एक्केचाळीस हजार दोनशे वीस) रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरी केला होता. त्याबाबत, होटगी रोड टाटा क्रोमा शोरुम चे मॅनेजर श्री. जितेंद्र दिलीप वाणी, रा. रोहीणी नगर भाग-३, ओम गर्जना चौक, सोलापूर यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन, विजापूर नाका पोलीस स्टेशन, सोलापूर शहर येथे गु.र.नं. २३६/२०२५. भा.न्या.सं.२०२३ चे कलम ३३१(३). ३३१ (४), ३०५ (ए) अन्वये, दिनांक ३०/०५/२०२५ रोजी, गुन्हा दाखल आहे.

वपोनि गुन्हे शाखा, श्री. सुनिल दोरगे साहेब, सपोनि शैलेश खेडकर व त्यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार, यांनी गुन्हयाचे घटनास्थळास भेट दिली. सपोनि शैलेश खेडकर व त्यांचे तपास पथकाने घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण केले. सपोनि शैलेश खेडकर यांचे तपास पथकातील पोलीस अंमलदार इम्रान जमादार यांनी, घटनास्थळाचे आजू-बाजूचे परिसरातील सी.सी.टी.व्ही फुटेज व



तांत्रीक माहितीचे अत्यंत बारकाईने निरीक्षण केले. त्याआधारे, सपोनि शैलेश खेडकर व तपास पथकास एका अनोळखी व्यक्तीवर संशय निर्माण झाला. त्याअनुषंगाने, त्या अनोळखी इसमाची अधिक माहिती संकलित करण्यास सुरुवात केली असताना, तपास पथकास सदरचा आरोपी हा आंतरराज्यीय घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार असून, त्याचेवर, गुजरात, मध्यप्रदेश, कर्नाटक, गोवा व महाराष्ट्र अशा विविध राज्यात घरफोडी-चोरी-चे व मोबाईल शॉपी फोडून चोरी केले बाबतचे गुन्हे दाखल असल्याची माहिती मिळाली,

**सोलापूर शहर गुन्हे शाखेची कामगिरी**

तसेच, दिनांक ०३/०६/२०२५ रोजी, गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेली माहिती व पथकाने संकलित केलेली तांत्रीक माहिती या दोन्ही बाबींचा सहाय्याने तपास पथकाने, गुन्हा करणारा आरोपी नागे रामनिवास उर्फ रामा मंजू गुप्ता, वय ३७ वर्षे, सध्या रा. बिहार नगर, सत्यभामा चाळ नं.२, रुम नं.१/२, टाटा पावर हाऊस जवळ, दिवा (पूर्व) ठाणे, जि. ठाणे राज्य महाराष्ट्र, यास, सोलापूर रेल्वे स्टेशन परिसरात संशयीतरित्या फिरत असताना, त्यास चोरी केलेल्या मोबाईल फोन सह ताब्यात घेतले. त्यावेळी त्याचेकडे गुन्ह्याचे अनुषंगाने अधिक चौकशी केली असता, त्याने वरील प्रमाणे दाखल गुन्हा केल्याची कबूली दिली. त्यामुळे, नमुद आरोपीस सदरचे गुन्हयात अटक करणेत आली आहे.

सपोनि शैलेश खेडकर व त्यांचे तपास पथकाने, गुन्हयाचे तपासात, आरोपीकडून, होटगी रोडवरील टाटा क्रोमा शोरुममधुन चोरी केलेले ॲपल, सॅमसंग, वन प्लस, ओप्पो, विवो, नथिंग अशा विविध कंपन्यांचे, एकुण ६७महागडे मोबाईल फोन व एक काळया रंगाची संक तसेच नमुद आरोपी त्याचा वापरत असलेला मोबाईल फोन असा एकूण ३६,३३,८२१/- (छत्तीस लाख तेहतीस हजार आठशे एकोणतीस) रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत केला. सदरचा गुन्हा सपोनि श्री. शैलेश खेडकर व त्यांचे तपास पथकाने अत्यंत कमी कालावधीत कौशल्याने, अविरत परिश्रम घेवून उघडकीस आणला आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. एम. राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापुर शहर, डॉ. दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे / वि.शा., श्री. राजन माने, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखेकडील नेमणुकीचे स.पो.नि. श्री. शैलेश खेडकर, सपोनि विजय पाटील व पथकातील पोलीस अंमलदार संदीप जावळे, विनोद रजपुत, राजकुमार पवार, इम्रान जमादार, उमेश पवार, आबा सावळे, अजिंक्य माने, धीरज सातपुते, इब्राहिम शेख, सिध्दाराम देशमुख, अजय गुंड, अंकुश भोसले, शैलेश बुगड, चालक सतिश काटे, शाम सुरवसे तसेच सायबर पो. स्टे कडील प्रकाश गायकवाड व मच्छिंद्र राठोड यांनी केली आहे.

# उत्कृष्ट बीएलओ म्हणून गजानन जायभाये यांचा दिल्लीत सन्मान




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा/जिल्हा प्रतिनिधी

जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा सेलू या ठिकाणी कार्यरत मुख्याध्यापक आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) श्री. गजानन सटवाजी जायभाये यांचा उत्कृष्ट बीएलओ म्हणून नवी दिल्लीतील भारत आंतरराष्ट्रीय लोकशाही व निवडणूक व्यवस्थापन संस्था (खखखऊएच्) येथे सन्मान करण्यात आला.

भारत निवडणूक आयोगाच्या वतीने १२ व १३ जून रोजी महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि ओडिशा या राज्यांतील निवडणूक अधिकाऱ्यांसाठी नवी दिल्लीत प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते.

यात जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार, पर्यवेक्षक आणि बीएलओ अधिकारी सहभागी झाले होते.महाराष्ट्रातून एकूण १३२ अधिकारी या प्रशिक्षणात उपस्थित होते. या प्रशिक्षणात २४-सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना,श्री. जायभाये यांनी बीएलओ प अधिक सुलभ व प्रभावी करण्याबाबत तसेच दुबार मतदार नोंदणी रोखण्यासाठी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. राज्याचे सहायक मुख्य निवडणूक अधिकारी किरण शार्दुल यांच्या हस्ते विशेष प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या प्रशिक्षण कार्यक्रमात मुर्तीजापुर उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी संदीपकुमार अपार यांनी मास्टर ट्रेनर म्हणून उपस्थित अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विवेक जोशी,निवडणूक आयुक्त, भारत निवडणूक आयोग हे उपस्थित होते.

# भिमाई आश्रमशाळेत विद्यार्थ्यांचे प्रवेशोत्सव उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी : इंदापूर येथील मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यार्थी वसतिगृह ट्रस्ट संचलित प्राथमिक,माध्यमिक, उच्च माध्यमिक आश्रमशाळा, मुलांचे व मुलींचे अनुदानित वसतिगृह यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर शैक्षणिक संकुलात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या सुरुवातीलाच प्रवेशोत्सवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी नवोगत विद्यार्थी व पालकांचे आश्रमशाळेच्या वतीने संस्थेचे सचिव ड. समीर मखरे, मुख्याध्यापक साहेबराव पवार, प्राचार्या अनिता साळवेंसह शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी गुलाबपुष्प देऊन स्वागत करत एक वेगळीच ऊर्जा निर्माण केली. सदैव नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणाऱ्या आश्रमशाळेत पाल्यांसह पालकांचा देखील स्वागत सोहळ्याप्रसंगी आनंद द्विगुणित झाला. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य,वह्या, पुस्तके इत्यादींचे वाटप संस्थेच्या अध्यक्षा शकुंतला मखरे (काकी), सचिव ड.समीर मखरे यांच्या हस्ते करण्यात आले. स्वागतासाठी शैक्षणिक संकुलाच्या मुख्य प्रवेशद्वारावर फुगे, फुलांचे गुच्छ लावून, आकर्षक रांगोळी काढण्यात आली होती. पालकांसाठी उत्तम नाश्त्याची सोय करण्यात आली होती. प्रसिद्ध व्याख्याते नानासाहेब चव्हाण, ड. समीर मखरे यांनी मार्गदर्शन केले.तर हिरालाल चंदनशिवे, सविता गोफणे, जावेद शेख, लता सातपुते यांनी मनोगत व्यक्त केले. संस्थेच्या अध्यक्षा शकुंतला मखरे यांनी विद्यार्थ्यांना प्रवेशोत्सवाच्या व नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते सुरज धाईंजेंसह विद्यार्थी, पालक, शिक्षक - शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.प्रास्ताविक साहेबराव पवार, सूत्रसंचालन नानासाहेब सानप, आभार रेश्मा झेंडे यांनी केले.



# चौकशी अहवालात आरोप निश्चितीनंतर तेलगोटेंवर कारवाई होणार कां?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : भंडारा येथे सहाय्यक आयुक्त असताना सुकेशिनी तेलगोटे यांच्या कार्यकाळात क्रीडांगण विकास योजनेंतर्गत ६५ लाख रुपयांचे कंत्राट देताना वित्तीय अनियमितता झाल्याचा ठपका चौकशी समितीच्या अहवालात ठेवण्यात आला आहे. हा अहवाल प्रभारी प्रादेशिक उपायुक्त सिद्धार्थ गायकवाड यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. त्यामुळे आता अहवाल बदलवला जाणार की, तेलगोटेंवर कारवाई होणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

> चौकशी समितीचा अहवाल आकसबुद्धीने तयार करण्यात आला आहे. मी केवळ निधीला मंजुरी देणारी संस्था म्हणून काम केले. त्यामुळे अहवालातील आरोप तथ्यहीन आहेत. तसेच सुशील शिंदे विक्षिप्त माणूस आहे. कार्यालयात त्याच्या संदर्भात अनेक तक्रारी आहेत. त्याने अनेकदा गोपनीय माहिती उघड केली आहे. कार्यालयात अनेकदा तो मद्यपान करून आल्याचे आढळून आले आहे. त्याने केलेले आरोप बिनबुडाचे आहेत.
> – **सुकेशिनी तेलगोटे,** सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण विभाग नागपूर

तत्कालीन प्रादेशिक उपायुक्त बाबा देशमुख यांनी लेखाधिकारी किरण चांदेकर यांच्या अध्यक्षतेखाली एप्रिल २०२५ मध्ये सहा सदस्यांची चौकशी समिती नेमली. समितीने १५ मे २०२५ ला प्रादेशिक उपायुक्तांकडे अहवाल सादर केला. यामध्ये तेलगोटे यांच्या काळात म्हणजे २०२१-२२ मध्ये क्रीडांगण विकास योजना राबवताना योग्यप्रकारे जबाबदारी पार पाडली गेली नाही, असा ठपका ठेवण्यात आला. पुरवठधारकाकडून खरेदी केलेल्या वस्तूंचा पुरवठा करण्यात आला असेल तर अंतिम देयके जोडणे आवश्यक आहे. मात्र, फाईलमध्ये देयके आढळून आली नाहीत. त्यामुळे पुरवठाधारकांना निधी देताना नियमांचे पालन केले नाही, असे समितीचे म्हणणे आहे. हे सर्व आरोप गंभीर असल्याने यावर प्रादेशिक उपायुक्त काय कारवाई करणार, असा प्रश्न आहे.

> कार्यालयाकडे अहवाल सादर झाला असून त्यावर कार्यवाही सुरू आहे. अहवालात जबाब नोंदविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना बोलावून सविस्तर चौकशी केली जाईल व त्यानंतर सर्व बाबी तपासून योग्य कारवाई केली जाईल.
> – **डॉ. सिद्धार्थ गायकवाड,** प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण.

**सुशील शिंदेंकडून तक्रार**

प्रादेशिक समाज कल्याण कार्यालयातील वरिष्ठ लिपिक सुशील शिंदे यांनी प्रताप-नगर पोलिसात याबाबत तक्रार केली. सुकेशिनी तेलगोटे यांनी शासनाची दिशाभूल करून बनावट कागदपत्रे बनवून घोटाळे केल्याचा आरोप या तक्रारीत आहे.

**विभागाच्या भूमिकेवरच प्रश्नचिन्ह**

क्रीडांगण विकास योजनेंतर्गत घोटाळ्याच्या तक्रारी यापूर्वीही झाल्या आहेत. भंडारा-गोंदिया लोकसभेचे माजी खासदार सुनील मेंढे यांनी तशी तक्रार केली होती. विजय वडेट्टीवार यांनी विरोधी पक्षनेते असताना या घोटाळ्यावर विधानसभेत प्रश्न उपस्थित केला होता. मात्र, यानंतरही सामाजिक न्याय विभागाच्या नागपूर प्रादेशिक कार्यालयाने चौकशी केली नाही. आता चौकशी समितीने आपल्या अहवालात अनेक गोष्टींवर ठपका ठेवला आहे. त्यामुळे विभागाकडून काय कारवाई होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



**बनावट दस्तऐवज**

अहवालानुसार, चौकशी समितीने समाज कल्याण विभागातील सहाय्यक आयुक्तांच्या कार्यालयाची तपासणी केली असता उपस्थित कर्मचाऱ्यांनी सांगितले की, अनुदान वितरण पूर्व झाल्यानंतर तथा पुरवठाधारकास अंतिम रक्कम अदा केल्यानंतर फाईल तयार झाली आहेत. त्या अनुषंगाने समिती सदस्यांद्वारे सदर फाईलची कार्यालयीन पूरक दस्ताऐवजाच्या आधारे फेरतपासणी केली असता खरेदी प्रक्रियेतील दस्तऐवज बनावट असल्याचे समोर आले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपूर शहरात २२ जून रोजी महास्वच्छता अभियान

## स्वच्छतेसाठी शहरातील ४२ ठिकाणे निश्चित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : आषाढी यात्रेच्या अनुषंगाने ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे व जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्या मार्गदशनाखाली पंढरपूर शहरात आषाढी पूर्वतयारी म्हणून महास्वच्छता अभियान सकाळी ७ ते १० या कालावधीत राबवले जाणार असल्याचे प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी सांगितले.



सदर महास्वच्छता अभियान सकाळी ७ ते १० या कालावधीत राबवले जाणार असून त्याकरिता पंढरपूर शहरातील ४२ ठिकाण निश्चित करण्यात आली आहे.

महास्वच्छता अभियाना करीता नेमून दिलेल्या ठिकाणी पथकांनी सकाळी ७. ०० ते १०. ०० वेळेत आपले काम पूर्ण करायचे आहे.

काम पूर्ण झाल्यानंतर या अभियानाची सांगता छत्रपती शिवाजी महाराज चौक, पंढरपूर येथे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असल्याची माहिती प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिली.

यावेळी मा.आ. प्रशांत परिचारक ,सोलापूर जिल्हा भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष मस्के, माऊली हलनवार, भाजपचे पदाधिकारी व सर्व कार्यकर्ते, उपस्थित राहणार आहे. हे अभियान ७ ते १० वेळेत काम पूर्ण करायचे आहे. काम पूर्ण झाल्यानंतर या अभियानाची सांगता छत्रपती शिवाजी महाराज चौक पंढरपूर येथे सोल-ापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली होणार असल्याची माहिती उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी यांनी दिली.

# महामार्ग पोलीस केंद्र इंदापूरच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक पदी सोमनाथ पडसळकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी



महामार्ग सुरक्षा पथकाचे, महाम ार्ग पोलीस केंद्र, इंदापूर च्या प्रभारी अधिकारी म्हणून, सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ पडसळकर नुकतेच रुजू झाले असून, महामार्ग सुरक्षा पथक अलर्ट मोडवर आले आहे. तसेच पालखी सोहळ्यातील वारकरी बांधवांच्या दळणवळणासाठी सर्व खबरदारी, व पालखी स्थळांना भेटी, महामार्ग सुरक्षा पथकाचे जिल्हा पोलीस अधीक्षक विक्रांत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली दिल्या असून, म हामार्ग सुरक्षा शाखेशी, नागरिकांना वाहतुकीसाठी काही अडचणी असल्यास संपर्क साधावा. असे आवाहन करण्यात आले आहे. यासंदर्भात माहिती देताना, पोलीस निरीक्षक प्रज्ञा देशमुख व सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ पडसळकर म्हणाले, पंढरपूर वारीसाठी वारकरी बांधव, दिंड्या, पालखी सोहळे महामार्गावरून जात असतात. कोणत्याही वारकरी बांधवांना दळणवळणाचा, कुठेही त्रास होऊ नये. यासाठी महामार्ग सुरक्षा पथक काम करणारा असून, वारी कालावधीत २४ तास पेट्रोलिंग असणार आहे.

बारामती ते इंदापूर व इंदापूर शहर ते अकलूज हद्दीच्या दरम्यान, संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचा मार्ग आहे. प्रत्येक विसाव्याच्या व मुक्कामी ठिकाणी महामार्ग सुरक्षा पथकाकडून भेटी दिल्या असून, स्थानिक नागरिकांची, गावकऱ्यांची संवाद साधण्यांत आला आहे. आषाढी वारीच्या निमित्ताने, नागरिकांनी वारकरी बंधूंना सेवा सुविधा देऊन, पोलीस प्रशासनास सहकार्य करावे. असेही आवाहन, पोलीस निरीक्षक प्रज्ञा देशमुख व सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ पडसळकर यांनी केले आहे.रस्ता सुरक्षा सप्ताहात इंदापूर तालुक्यात जनजागृती करण्यासाठी, गावागावातील शाळा माध्यमिक विद्यालय, कॉलेज तसेच चालक, वाहकांना रस्ते वाहतुकीचे नियम तंतोतंत पालन करण्यासाठी मार्गदर्शन, करण्यात येत आहे. वारी कालावधीत पालखी सोहळ्यातील वाहनांना तसेच मानाच्या पालख्या ज्या मार्गावरून जातात. यांची पथकरातून शासनाच्या माध्यमातून सूट देण्यात आलेली आहे. असे शासन परिपत्रक जाहीर झाले आहे त्यामुळे यंदाची वारी वारकऱ्यांसाठी लाभदायक असणार आहे.

# भाविकांच्या मागणीमुळे टोकन दर्शन संख्येत वाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



**कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली माहिती**

पंढरपूर /प्रतिनिधी : आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समि तीने भाविकांच्या मागणीन-ुसार आणि सद्यस्थिती विचार करून टोकन आधारित दर्शन संख्येत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

सध्या सुरू असलेल्या टोकन दर्शन व्यवस्थेला भाविकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असून, दर्शनासाठी व्यवस्थीत रांगा, वेगवान गतीने होत असलेले संचलन आणि सुरळीत यंत्रणेमुळे अधिक भाविकांना ही सुविधा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता जाणवत होती.

त्यामुळे, दर तासाला दिल्या जाणाऱ्या टोकन संख्येत १०० ने वाढ करताना भाविकांना अधिक सुलभतेने आणि कमी वेळेत दर्शन घेता यावे हा हेतू आहे. एकूण ६स्लॉट मध्ये प्रत्येकी १०० टोकन असे एकूण ६०० टोकन पास वाढ करण्यात येणार आहे.२१ जून ते २६ जून पर्यंत दर्शनासाठी वेळ, सुरक्षा, आणि भाविकांच्या सोयीचा विचार करून ही सुधारणा करण्यात येत आहे.

श्री राजेंद्र शेळके यांनी असेही स्पष्ट केले की, भाविकांनी अधिकृत टोकन ऑनलाईन प्रणालीद्वारेच बुक करावे, व अफवांपासून दूर राहावे. ही व्यवस्था भाविकांच्या सुविधेसाठी असून यामधून अधिकाधिक लोकांना श्री विठ्ठलाचे दर्शन घेता येईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

येत्या काही दिवसांत आषाढी वारीची गर्दी वाढण्याची शक्यता असून, या पार्श्वभूम ीवर समितीकडून सतत दर्शन व्यवस्थेचा आढावा घेत योग्य त्या सुधारणा करण्यात येणार असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगितले.

# पंढरपूर तालुक्यात येणाऱ्या सर्व मार्गावर व शहरात स्वागत मंडप, कमान घालण्यास प्रतिबंध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : आषाढी यात्रा सोहळा दि. ०६ जुलै २०२५ रोजी संपन्न होत आहे. आषाढी यात्रा सोहळ्यासाठी श्री संत ज्ञा-नेश्वर महाराज व श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळा तसेच अन्य पालखी सोहळ्यासोबत लाखो भाविक पंढरपूर येथे येतात. येणाऱ्या भाविकांची यात्रा सुलभ व सुरक्षितपणे पार पडावी यासाठी पंढरपूर तालुक्यात प्रवेश करणाऱ्या सर्व मार्गावर व शहराच्या हद्दीवर व शहरात स्वागत कमान घालण्यास स्व-ागत मंडप घालण्यास तसेच पंढरपूर शहरात व तालुक्याच्या परिसरात होर्डिंग /बॅनर्स / फ्लेक्स लावण्यास दि. १५ जुलै २०२५ पर्यंत प्रतिबंध करण्यात आला आहे. या बाबतचे आदेश उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी पारीत केला आहे.

माळशिरस तालुक्यातून पा-लखी सोहळे, पिराची कुरोली येथे बंधू भेट होऊन पुढे पंढरपूरकडे निघतात, त्यावेळी पालखी सोहळ्याच्या स्वागतासाठी ठीकठिकाणी मंडप घातले जा-तात, स्वागत कमानी उभारल्या जातात, तसेच पालखी मार्गावर ठिकठिकाणी स्वागत फलक, फ्लेक्स व बॅनर लावले जातात. पालखी सोहळ्यासोबत लाखो भाविक पायी चालत पंढरपूर कडे येतात. विसाव्यासाठी तसेच न्याहारी व भोजनासाठी ते ठिकठिकाणी थांबतात. पालखी सोहळ्यासाठी स्वागत मंडप व स्वागत स्टेजमुळे सोहळयासोबत असणाऱ्या भाविकांना पुढे जाण्यास अडथळे निर्माण होतात. ठीक ठिकाणी स्वागतासाठी थांबलेल्या भाविकांमुळे पा-लखी सोहळ्यासोबत असणाऱ्या वारकऱ्यांना पुढे जाण्यास तसेच पालखी सोहळा वेळेत पुढील विसाव्यावर पोहचण्यास विलंब होतो, तसेच गर्दीचे व्यवस्थापन होत नाही. त्यामुळे अनुचित प्रकार घडण्याची शक्यता आहे.

तसेच मार्गावर व रस्ता दुभाजकावर लावलेले फ्लेक्स व बॅनर मुळे भाविकांना रस्त्यावरील वाहने दिसत नाहीत. त्यामुळे अपघात होण्याचा धोका निम र्ण होतो. तसेच होल्डिंग्ज व बॅनरची उंची जास्त असते. वादळी वाऱ्यामुळे किंवा वाहनांचा धक्का लागून ते कोसळू शकतात व त्यातून जीवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही, याकरिता, उपविभागीय दंडाधिकारी पंढरपूर विभाग पंढरपूर भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करून प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.

# बु. एस.आर.दादा गायकवाड यांच्या पुण्यतिथी निमित्त शुक्रवारी सोलापुरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन : अजित भाऊ गायकवाड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी



बु. एस.आर. दादा गायकवाड यांच्या शुक्रवारी होणाऱ्या पुण्यतिथी निमित्त आज सोलापुरातील साबळे हॉस्पिटल येथे भव्य रक्तदान शिबिराजे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती बॉबी ग्रुप चे संस्थापक अध्यक्ष मा.नगरसेवक अजित भाऊ गायकवाड यांनी दिली.

आंबेडकरी चळवळीतील झंझावात आणि दलित पँथर चे संस्थापक सदस्य जेष्ठ पँथर बुद्धवासी एस आर दादा गायकवाड यांच्या पुण्यतिथी निमित्त आज शुक्रवार दिनांक २० जुन २५ रोजी जम्मा वस्ती येथील साबळे हॉस्पिटल येथे भव्य रक्तदान शिबिराजे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती बॉबी ग्रुप चे संस्थापक अध्यक्ष आणि मा. नगरसेवक आणि सोलाप-ुरातील लाखो तरुणांचे आयकॉन अजित भाऊ गायकवाड यांनी प्रस्तुत प्रतिनिधी शी बोलताना दिली.

आज शुक्रवार दिनांक २० जून २५ रोजी जम्मा वस्ती येथील साबळे हॉस्पिटल येथे सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले असून या रक्तदान शिबिराचे सोल-ापूर शहर उत्तर चे आमदार भाजपचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री विजयकुमार देशमुख मालक यांच्या हस्ते आणि इतर अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत होणार असल्याची माहिती याप्रसंगी देण्यात आली. या शिबिराचे आयोजन बॉबी ग्रुप च्या वतीने करण्यात आले एस आर दादा गायकवाड हे आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ नेते होते ते दलित पँथर चे संस्थापक सदस्य होते. म राठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळ तसेच सोलापुरातील विविध आंदोलने व चळवळीत त्यांनी सहभाग घेऊन आंबेडकरी चळवळीत मोठे योगदान दिले होते त्यांच्या काळातील आता एक ही व्यक्ती हयात राहिले नसून एस आर दादा गायकवाड यांचाकांबेडकरी चळवळीतील कामात मोठा वाटा राहिला आहे.

> एस आर दादा गायकवाड हे आंबेडकरी चळवळीत राहून मराठवाडा विद्यापीठ नामांतर प्रश्नावर सक्रिय सहभागी राहिलेले लढाऊ पँथर होते त्यांनी सोलापुर जिल्ह्यातील आंबेडकरी चळवळीसाठी मोठे योगदान दिले.आहेत. सोलापूर जिल्ह्यातील गायरान जमिनीच्या प्रश्नावर त्यांनी वेळोवेळी पँथर च्यामाध्यमातून नेहमीच आवाज उठवला आणि याप्रश्नवर सोलापूर जिल्ह्यात म ोठे आंदोलन ही उभारले होते झोपडपट्टी तील प्रश्न असो किंवा इतर कोणत्याही प्रकारचे आंदोलन असो दादा यात सहभाई होत असे.
>
> **– सुयश गायकवाड (आंबेडकरी चळवळीतील युवा कार्यकर्ते सोलापूर)**

त्यांच्या पुण्यतिथी निमित्त-ाने आयोजित विविध कार्यक्रमांना तमाम नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन बॉबी ग्रुप च्या वतीने अजित भाऊ गायकवाड यांचे कट्टर समर्थक सुयश गायकवाड आणि मित्र परिवार व अजित भाऊ गायकवाड मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# आ.समाधान आवताडे यांच्या प्रयत्नांतून मंगळवेढा आगाराच्या ताब्यात नव्या ५ बसेस दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या पाठपुराव्यातून आणि महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाच्या म ाध्यमातून मंगळवेढा आगारात नव्या ५ बसेस दाखल करण्यात आल्या असून या बसेसचे लोकार्पण आमदार सम ाधान आवताडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार आवताडे यांनी मंगळवेढा परिवहन पदाधिकारी व इतर मंडळींच्या सोबत या नव्या बसमधून आरामदायी आणि सुरक्षित प्रवासाचा अनुभव घेतला.




ग्रामीणभागाची जीवनवाहिनी म्हणून एसटी महामंडळ महत्त्वाची भूमिका बजावत असून या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे सक्षमीकरण करण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील म हायुती सरकार सातत्याने करत आहे. मंगळवेढा आगारास मिळालेल्या या नव्या बसमुळे मंगळवेढेकरांना निश्चितच दिलासा मिळणार असून आरामदायी आणि सुरक्षित प्रवास होणार आहे. मंगळवेढा तालुक्याला दिलेल्या या ५ नव्या बसेसबद्दल मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस आणि परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांचे मनापासून

यावेळी प्रकाश गायकवाड, जिल्हा अध्यक्ष शशिकांत चव्हाण, येताळा भगत, राजेंद्र सुरवसे, लक्ष्मण जगताप, औदुंबर वाडदेकर,चंदकांत पडवळे,अजित जगताप,दादा ओम ने,सतीश मोहिते,खंडू खंदारे,प्रवीण खवतोडे, बबलु सुतार, डॉ. शरद शिर्के,कैलास कोळी, महादेव जाधव,संतोष मोरे,शिवाजी सरगर, सचिन शिंदे,डी. सी.जाधव, युवराज घुले, नागेश डोंगरे,सुदर्शन यादव, संतोष मोगले, प्रताप सावजी, रमेश जोशी,सोलापूर जिल्हा परिवहन विभागीय नियंत्रक अमोल गोंजारी साहेब, मंगळवेढा आगार प्रमुख संजय भोसले,आनंद मुढे, सिद्धेश्वर कोकरे, गंगाधर काकनकी, क्रांती दत्तू आदी मान्यवर उपस्थित होते.

**शिवसेना ठाकरे गटाच्या आंदोलनाचा दिला होता इशारा**

**मुरुम टाकण्यासाठी माजी नगराध्यक्ष भरतशेठ शहा यांचा पुढाकार**

# ... अखेर इंदापूर येथील बाब्रस मळ्यात रस्त्यावर पडला मुरूम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी

इंदापूर शहरातील बाब्रस मळा येथील एकाड/म्हेत्रे बिल्डिंग कडे जाणारा रस्ता पावसामुळे अत्यंत खराब झाला होता. पावसाच्या पाण्यामुळे स्थानिक रहिवाशांना, विद्यार्थ्यांना व व्यापाऱ्यांना मोठा त्रास होत होता. सदरील परिसरात ४०० हून अधिक लोक वास्तव्यास असून वाहतुकीसाठी एकमेव पर्यायी मार्ग असलेल्या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनी असून पावसानंतर मातीच्या रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडून पाणी साठून राहत असल्याने संपूर्ण रस्ता चिखलमय झाला होता. त्यामुळे स्थानिक रहिवाशांना घराबाहेर पडणेही मुश्किल झाले होते. महिला वर्गाला गाडीवरून जाताना मोठा धोका निर्माण झाला होता. परिसरातील नागरिकांना घरातून बाहेर पाडण्यासाठी दुसरा पर्यायी कोणताच मार्ग नव्हता.



या संबंधी स्थानिक रहिवाशांनी शिवसेना ठाकरे गटाचे इंदापूर शहरप्रमुख मेजर महादेव सोमवंशी यांच्याकडे रोज होत असलेल्या त्रासाबद्दल सांगितले असता तातडीने मेजर महादेव सोमवंशी यांनी शिवसेना जिल्हा समन्वयक भीमराव भोसले, तालुका संघटक सुदर्शन रणवरे, विभागप्रमुख अंकुश गलांडे, दैनिक जनप्रवासचे पत्रकार शिवाजी पवार, व विश्व २४ न्युज दैनिक यश सिद्धी न्यूज चे पत्रकार अतुल सोनकांबळे यांच्यासह रस्त्याची पाहणी करून नगरपरिषद इंदापूर यांच्याकडे रस्ता दुरुस्तीची मीडियाच्या माध्यमातून व नगर परिषद अधिकरी यांच्याकडे फोन द्वारे मागणी केली होती.

शिवसेना पक्षाच्यावतीने केलेली मागणी आणि नगरपरिषदचे माजी नगराध्यक्ष भरतशेठ शहा यांनी रस्ता दुरुस्तीसाठी घेतलेला पुढाकार याम ुळे गुरुवारी दिनांक १२ जून रोजी नगरपरिषद इंदापूर यांच्यामार्फत रस्त्यावर तातडीने मुरूम टाकून रस्ता प्रवासयोग्य करुन वाहतुकीस खुला करुन देण्यात आला. त्याम ुळे स्थानिक रहिवाशांनी समाधान व्यक्त केले.

स्थानिक रहिवाशांनी रस्त्याची अडचण सांगितली होती. यावेळी आम्ही आमचे तालुकाप्रमुख नितीन शिंदे यांच्याशी चर्चा करुन पक्षाच्यावतीने बाब्रस मळ्यात जाऊन रस्त्याची पाहणी केली. रस्त्यावर सगळीकडे चिखल साठला होता आणि रस्त्यावरून जाताना लोकांचे हाल पाहून नगरपरिषदेकडे मुरूम टाकण्याची मागणी केली होती. नागरिकांचा जाण्या येण्याचा प्रश्न मार्गी लागल्याबद्दल समाधान आहे. नगरपरिषदेणे रस्ता डांबरीकरण करणे गरजेचे आहे म्हणजे भविष्यात होणाऱ्या त्रासापासून लोकांची म ुक्तता होऊ शकेल, असे शिवसेना ठाकरे गटाचे शहरप्रमुख महादेव सोमवंशी म्हणाले.

दरवर्षी पावसाळ्यात आम्हांला रस्त्याच्या अडचणीमुळे घराबाहेर पडणे मुश्किल झाले होते. म हिला, जेष्ठ नागरिक व विध्यार्थी यांना सर्वाधिक त्रास होत होता. आमच्यासाठी शिवसेना शहरप्रमुख मेजर महादेव सोमवंशी व त्यांच्या सहकाऱ्यांनी आवाज उठवला त्याबद्दल सर्व शिवसैनिकांचे, तसेच मुरुम टाकण्यासाठी सहकार्य करणारे माजी नगराध्यक्ष भरतशेठ शहा यांचे, इंदापूर नगरपरिषदेचे आणि आमचा प्रश्न उचलून धरल्याबद्दल विश्व २४ न्यूज दैनिक यश सिद्धी न्यूज चे पत्रकार अतुल सोनकांबळे व जनप्रवास चे पत्रकार शिवाजी पवार यांचेआम्ही रहिवाश्यांच्यावतीने आभार व्यक्त करतो, असे येथील स्थानिक रहिवाशी महेश झगडे सर यांनी सांगितले.



# पालखी मार्ग, तळांवरील सर्व कामे २५ जून पर्यंत पूर्ण करावीत

## जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी अधिकाऱ्यांना दिल्या सूचना



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी शुद्ध एकादशी सोहळा ०६ जुलै २०२५ रोजी होणार असून, या सोहळ्यासाठी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी व जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी तसेच अन्य संताच्या पालखी सोहळ्यासोबत मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक पायी चालत येतात. सर्व वारकरी भाविकांना पालखी मार्ग, विसावा व पालखी तळांवर तसेच रिंगण सोहळ्याच्या ठिकाणची सर्व कामे संबधित विभागाने समन्वय साधून २५ जून पर्यंत पुर्ण करावीत अशा सूचना जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिल्या.

आषाढी यात्रेच्या अनुषंगाने केबीपी कॉलेज, पंढरपूर येथे बैठकीचे आयोजनकरण्यात आले होते. या बैठकीस मुख्य कार्यकारी आधिकारी कुलदिप जंगम, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर जिल्हाधिकारी मोनिकासिंह ठाकूर, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, प्रांताधिकारी सचिन इथापे, विजया पागांरकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता अमित निमकर, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, भीमा पाटबंधारे कार्यकारी अभियंता श्री. हरसुरे, तहसिलदार सचिन लंगुटे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी महेश रोकडे, तालुका आरोग्य अधिकारी एकनाथ बोधले, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे श्री घोडके यांच्यासह संबधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद म्हणाले, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पालखी महामार्गावर वारकरी भाविकांच्या सुरक्षेसाठी व पालखी सोहळ्याच्या वाहतुक मार्गात कोणाताही अडथळा निर्माण होऊ नये यासाठी पोलीस प्रशासन व संबधित विभागाने सुचविलेले कामे तात्काळ करुन घ्यावीत. त्याचबरोबर आवश्यक ठिकाणी पालखी सोहळ्यास पालखी तळाकडे जाण्यासाठी व येण्यासाठी योग्य प्रमाणात उतार करावा. भीमा पाटबंधारे विभागाने चंद्रभागा नदीपात्रात पाणीपातळी बाबतचे माहिती फलक लावावेत. उजनी धरणात येणाऱ्या विसर्गामुळे उजनी धरणाची पाणी पातळी दिवसेदिवस वाढत आहे. उजनी धरणातून भीमा नदी पात्रात पाणी सोडण्यासाठी संबधित विभागाशी चर्चा करुन योग्य नियोजन करण्यात येईल. तसेच वीर धरणतील पाणी सोडण्याबाबतही चर्चा करण्यात करुन चंद्रभागा नदी पात्रात योग्य प्रमाणात पाणी पातळी राहिल याबाबत नियोजन करण्यात येईल.

तसेच पालखी मार्गावर, तळांवर भाविकांसाठी मुबलक प्रमाणात शौचालयाची उपलब्धता करण्यात येणार असून, शौचालयाची वेळोवेळी स्वच्छता करण्यासाठी सक्शेन मशीन व जेटींग मशीनच्या वाहनांना जाण्यासाठी पोलीस प्रशासनाने वाहतुक नियोजन करावे. बीएसएनएल विभागाने पालखी मार्ग, तळ तसेच रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी वायफाय सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तात्काळ नियोजन करावे. तसेच पोलीस प्रशासनास वायरलेस टेलीफोन उपलब्ध करुन द्यावेत. आरोग्य विभागाने महाआरोग्य शिबीरासाठी जागेची निश्चिती करावी तसेच शिबीरासाठी लागणाऱ्या विद्युत व्यवस्था, पिण्याचे पाणी तसेच आवश्यक सुविधा संबधित विभागाकडून उपलब्ध करुन देण्यात येतील असेही जिल्हाधिकारी आशिर्वाद यांनी यावेळी सांगितले.

यावेळी बैठकीत पालखी मार्ग, तळ तसेच रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी वारकरी भाविकांना सुविधा उपलब्धतेसाठी सर्व संबधित विभागाच्या अडचणी जाणून घेवून ज्या विभागाची मदत लागणार त्यांना तात्काळ जिल्हाधिकारी कुमार आशर्वाद, मुख्य कार्यकारी आधिकारी कुलदिप जंगम, जिल्हा पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांनी आवश्यक सूचना दिल्या.



## स्वेरीतील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना निरोप



पंढरपूर- गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) च्या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग (इ. अँड टी.सी.) या विभागाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयातून निरोप (फेअरवेल) देण्याचा कार्यक्रम अत्यंत भावनिक वातावरणात पार पडला. निरोप समारंभाचा हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील एक अविस्मरणीय क्षण ठरला. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर कुठे आसू तर कुठे हसू दिसून येत होते.

स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ ऑफ इंजिनिअरींग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार यांच्या सहकार्याने व उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार व विभागप्रमुख डॉ. सुमंत आनंद यांच्या नेतृत्वाखाली इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागातील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरूवातीला विद्यार्थ्यांनी विविध खेळ, आठवणी, मनोगत, हिंदी- मराठी भावगीतं आणि मिमिक्रीच्या सादरीकरणामुळे वातावरण आनंदमय बनवले होते. स्वेरीमध्ये चार वर्षे शिक्षण घेतल्यानंतर परतताना विद्यार्थी भावनिक झाले होते. त्यामुळे प्राध्यापकांबद्दलची कृतज्ञता व्यक्त करताना आलेले अनुभव, संघर्ष, आठवणी, शिक्षण आणि या सर्वांमधून मिळालेला स्नेहभाव सांगताना काही विद्यार्थ्यांचे डोळे पाणावले होते तर काहींनी शिक्षण घेत असताना केलेली तारेवरची कसरत सांगताना आणि त्यातून मिळविलेल्या यशाचा गोडवा सांगताना वातावरण चांगलेच भावनिक बनवले. एकूणच या निरोपाच्या कार्यक्रमातून शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील नाते किती घट्ट असते हेच जणू दिसत होते. यावेळी संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना स्मृतिचिन्ह देवून गौरविण्यात आले. याप्रसंगी अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता डॉ. करण पाटील यांनी विद्यार्थ्यांना भावनिक आणि प्रेरणादायी मार्गदर्शन करताना म्हणाले की, 'आयुष्यात आपण कितीही मोठे यश मिळवले, तरी आपल्या आई-वडिलांच्या कष्टांची आठवण ठेवावी. त्यांचा संघर्षच आपल्याला या यशाच्या टप्प्यावर आणत असतो. आपल्या यशामागे आई वडिलांचे परिश्रम आहेत याची जाणीव ठेवावी.' यावेळी विद्यार्थ्यांसाठी नाष्ट्याची सोय केली होती. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या आठवणींच्या कप्प्यात महाविद्यालयातील इमारतीच्या विविध भागातील, कॅम्पसमध्ये मधील फोटो सेल्फी काढत होते. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या जीवनातील एक प्रेरणादायी, आनंददायी आणि हृदयस्पर्शी पर्व ठरला हे मात्र नक्की. यावेळी विभागातील सर्व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा.स्मिता गावडे यांनी काम पाहिले. निरोप समारंभ कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.एस. एस. जाधव यांनी केले तर प्रा. आर. बी. पवार यांनी आभार मानले.

## पडघ्यातील सर्वीस रस्त्यावर खड्डे, नागरीकांच्या जीवाशी खेळ



ठाणे/प्रतिनिधी : मिलिंद जाधव

वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथील मुंबई नाशिक महामार्गालगत असलेल्या सर्वीस रस्त्यावर खड्डे, पडले असून त्यात पावसाचे पाणी साचले आहे.तर नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

मुंबई नाशिक महामार्गावरून पडघा गावात येण्यासाठी व गावाबाहेर पडण्यासाठी सर्वीस रस्ता बनवला असुन या रस्त्यावर शेकडो वाहनांची रात्र दिवस वर्दळ असते त्याची दुरुस्ती देखभाल मुंबई नाशिक महामार्गावरील टोल वसुली करणारी कंपनी करीत आहे. पडघा वनपरिक्षेत्र कार्यालयाच्या जवळील सर्वीस रस्त्यावर कित्येक महीन्यांपासुन मोठे खड्डे पडले असुन ते पावसाच्या पाण्याने भरल्याने रात्रीच्या वेळेस प्रवाशी रिक्षा, दुचाकी अडकुन अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच हा सर्वीस रस्ता संपूर्ण उखडला असुन अनेक ठिकाणी सखोल भागात पाणी तुंबल्याने वाहनचालकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. तर टोलवसुली करण्यात मग्न असणारी कंपनी काहीच उपाययोजना करीत नसल्याने नागरिकच सुरक्षीततेसाठी खड्डयाभोवती दगडी लाऊन काळजी घेत आहेत. ज्या ठिकाणी खड्डे पडले आहेत. ते भरण्याची मागणी नागरिकांकडुन होत आहे.

## सचिन लोहार (सैनिक) यांचा सत्कार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

टाकळीवाडी/प्रतिनिधी

टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील बी.एस.एफ मध्ये कार्यरत असणारे सचिन लोहार यांनी ऑपरेशन सिंदूर मध्ये उत्कृष्ट रित्या कामगिरी बजावल्याबद्दल यांचा सत्कार राहूलदादा घाटगे (एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर-श्री गुरुदत्त शुगर्स, टाकळीवाडी.) यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

व शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी संजय कुंभार (उद्योगपती), आनंद उन्हाळे, रामदास लोहार,अजित बिरणगे उपस्थिती होते.

## हिंदी नकोच,मनसेकडून शाळांना निवेदन; घाटकोपरमध्ये राज ठाकरे यांच्या आदेशाची अंमलबजावणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/प्रतिनिधी :

इयत्ता पहिलीपासून ते तिसरीपर्यंत सक्तीची भाषा म्हणून 'हिंदी' लागू करण्याच्या निर्णयाला मनसेने तीव्र विरोध दर्शवत कारवाई सुरू केली आहे.मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिलेल्या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी मनसेचे घाटकोपर पश्चिम विभाग अध्यक्ष गणेश चुक्कल यांच्या मार्गदर्शनाखाली घाटकोपर पश्चिम मधील विविध शाळांमध्ये निवेदन देण्यात आले.



मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये सक्तीच्या हिंदीला विरोधकरण्या संदर्भातील पत्रक घाटकोपर पश्चिम मधील सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना प्रत्यक्ष भेटून मनसे पदाधिकारी यांच्याकडून देण्यात आले.यावेळी मनसे पदाधिकाऱ्यांनी सर्व शाळांच्या मुख्यध्यापकांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची भूमिका समजावून सांगितली.

यावेळी शिक्षकांनी ही शासनाच्या हिंदी सक्तीच्या निर्णयाला विरोध दर्शविला. सदर प्रसंगी महाराष्ट्र नवनिर्माण सेना घाटकोपर (प) म.न.वि.से मा.विभाग अध्यक्ष समीर भाई सावंत, उपविभाग अध्यक्ष विजय परब,महाराष्ट्र सैनिक चेतन भटकर,मंगेश सावंत, म.न.वि.से उपविभाग अध्यक्ष तेजस भालेकर,म.न.वि.से विभाग सचिव अर्जुन आसोलकर,उपशाखा अध्यक्ष श्री.चेतन पटेल,अमित काळोखे,सागर गुंजाळ आणि असंख्य महाराष्ट्र सैनिक यावेळी उपस्थित होते.

**राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाची दुसरी राज्यस्तरीय बैठक**

**ऍड.मंगेश ससाणे यांचे प्रतिपादन**

# बहुजन समाज परिवर्तन क्रांतीत शिक्षकांचे योगदान महत्वाचे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधि : समाजाला वैचारिक जागृत करण्याचे काम शिक्षकाशिवाय इतर कोणीही करू शकत नाही असा ठाम विश्वास ओबीसी संघर्ष युद्धे ऍड. मंगेश ससाणे यांनी व्यक्त केला. राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाच्या राज्यस्तरीय बैठकीमध्ये मंगेश ससाणे प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघाची दुसरी राज्यस्तरीय बैठक नुकतीच पार पडली. समस्त ओबीसी बहुजन वर्गाला जागृत करून त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देण्याच्या दृष्टीने ओबीसी संघर्ष योद्धे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आरक्षणाची न्यायालयीन लढाई लढणारे, उपोषण कर्ते , अभ्यासु वकील श्री. मंगेश ससाणे यांनी ओबीसी समाजातील विध्यार्थ्यांसाठी स्थापित केलेली महाजोती या संस्थेबाबत माहिती देऊन महाज्योती च्या विविध योजना, शासनाकडून सुरू असलेल्या विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती योजना ओबीसी महामंडळ योजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ओबीसी समाजातील सुशिक्षित वर्गात जाणीव जागृती झाल्याशिवाय आपल्या हक्काचे संरक्षण होणार नाही हे स्पष्ट आहे. गेल्या दोन अडीच वर्षांत राज्यातील समाजमन ढवळून निघाले असुन अनेक कठीण प्रसंगातून ओबीसी जात आहे. यासाठी आपण एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. समाजावर होणारे अन्याय अत्याचार उघडकीला आणुन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करावे लागतील असे आवाहन त्यांनी यावेळी केले. राज्यातील रोस्टर घोटाळा हा एक गंभीर प्रश्न असून अनेक प्रकरणात असे निदर्शनास आले आहे की, सर्वसाधारण प्रवर्गातुन नोकरी मिळालेली असताना सुद्धा नंतर च्या कालावधीत संबंधितांचे जात प्रमाणपत्र मागवुन घेत त्याचा जातीचा जो प्रवर्ग आहे त्या राखीव प्रवर्गात त्याचा समावेश केला असल्याचे बहुतांश जिल्ह्यातील शिक्षक बांधवांनी निदर्शनास आणून दिले. नाशिक जिल्ह्यात पेसा कायद्याचे उल्लंघन होत असल्याचे नाशिक येथील पदाधिकारी बांधवांनी सांगितले. ओबीसी प्रवर्गातील मॅट्रिक पुर्व शिष्यवृत्ती विनाअट सर्वाना द्यावी, टाळाटाळ व हयगय करणाऱ्यांना दोषी धरावे याबाबतही चर्चा करण्यात आली. पदोन्नतीत ओबीसी बांधवाना संख्येच्या प्रमाणात आरक्षण द्यावे याबाबत चर्चा करून ठराव घेण्यात आला. या सर्व बाबी शासनाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी दिवाळी सुट्टीत संघटनेचे राज्य स्तरीय अधिवेशन शिर्डी अथवा अलिबाग येथे घेऊन त्या अधिवेशनात मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री, बहुजन कल्याण मंत्री, ग्रामविकास मंत्री याना निमंत्रित करून त्यांना या सर्व बहुजन समाजाच्या समस्या लक्षात

राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघ, महाराष्ट्र राज्य

आणून देऊ आपण मोठ्या संख्येने या अधिवेशनात सामील व्हावे असे आवाहन प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपल्ले यांनी केले..सन्माननीय ओबीसी योद्धे छगनराव भुजबळ साहेब यांच्या मंत्रिमंडळातील प्रवेशाबद्दल अभिनंदनाचा ठराव घेण्यात आला ..नाशिक हुन बबनराव चव्हाण,प्रशांत शेवाळे व राजेंद्र खैरनार यांनी लवकरच साहेबांचा सत्कार सोहळ्याचे नियोजन करू असे सांगितले. राज्य सरचिटणीस श्री. संतोष भोजने यांनी उपस्थित सदस्यांना मार्गदर्शन करताना राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक महासंघ हा राज्यातील सर्व शिक्षकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करत असताना जास्तीत जास्त संख्येने आजीवन सभासद बनवून संघटनेची ताकद महाराष्ट्रात निर्माण होण्यासाठी बहुजन शिक्षक या व्यासपीठावर यावेत यासाठी प्रयत्न करावेत अशी सूचना सर्व जिल्हा पदाधिकारी यांना केली. समाजातील सर्व ओबीसी./ एन. टी./व्ही. जे. /एन. टी./ एस. बी. सी. या सर्व विद्यार्थ्यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती मिळते पण याबाबत जागरूकता नसल्याने ओबीसी विध्यार्थी या योजनांपासून कोसोदूर राहतात त्यामुळे आपण जबाबदार घटक या नात्याने आपल्या जिल्ह्यातील तालुक्यातील शाळेतील सर्व विद्यार्थी यांचे प्रस्ताव सादर करून त्याचा पाठपुरावा ही करावा असे आवाहन केले.

या सभेला संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपले, सरचिटणीस संतोष भोजने, उपाध्यक्ष सुखदेव भालेकर, कार्याध्यक्ष बबनराव चव्हाण, महिला प्रदेशाध्यक्ष रेखाताई सुडे, प्रसिद्धी प्रमुख सचिन गडपतवार, राज्य कोषाध्यक्ष संजय भोईर, राज्य प्रतिनिधी राजेंद्र खैरनार, हिंगोली जिल्हाध्यक्ष लहू राक्षे, लातूर जिल्हाध्यक्ष हिरालाल पाटील, धाराशिव जिल्हाध्यक्ष अनंत फुलसुंदर, खाजगी विभाग प्रमुख राजन पाटील, मनपा प्रमुख श्रीराम पळसकर, कोकण विभाग प्रमुख गोरख आघाव, मराठवाडा विभाग प्रमुख संजय मळभागे, भालचंद्र खाडे, राजेंद्र सरक, आप्पाराव शिंदे, अरुण भूकन, खंडेराव सानप, पुरुषोत्तम म्हेत्रे, भाऊसाहेब जाधव, सदाशिव भाले, काशिनाथ घाणेकर, दशरथ शिंगारे, धनंजय सरक, आप्पा खैरनार, संतोष केंद्रे,रविभाऊ गुट्टे,उमाकांत डिगे, श्रीकांत धनवट, राम जोरवर ,सचिन गणपतवार, चंद्रकांत चौरे, ज्ञानेश्वर महाजन, विनायक केंद्रे, आनंदा गांगुर्डे, ज्ञानेश्वर महाजन, भास्कर म्हात्रे, सुनील शेलार, शंकरराव मुरकुटे, नूरखा पठाण, विजय महाजन, संतोष सगर, एमडी काळे, विष्णू काळे, सुभाष पांचाळ, नामा पवार, सुधाकर अटके, सुदर्शन गिराम, सिंधू शेळके, संजय भोईर, बालाजी चेटमपल्ले, संतोष भोजने, कुंडलिक चौधरी, संकेत पांचाळ, श्रीकांत मददे, सुधाकर अटके, सोनिया जमदाडे, मंगेश सुवर्णकार, सुधाकर अटके, प्रज्वल मोहटे, जितेंद्र कुमार मानकर, रमेश खाडे, नानासाहेब गोरणे, लक्ष्मण दावणकर, परमेश्वर गलांडे, अंगद सोगे, अजित जाधव, सुभाष सानप, धनाजी घरत, प्रशांत शेवाळे, राहुल म्हेत्रे, रामदास वडीमिले, अर्जुन जाधव, मिलिंद दुधाळ, सचिन रासवे, विनया जाधव, रामराव मुरकुटे,संतोष चव्हाण आदी पदाधिकारी उपस्थित होते.